International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा व जातीव्यवस्थेचे उच्चाटन

**सुधीर तुळशीदास न्हावेलकर**
संशोधक विद्यार्थी, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
***Corresponding Author*- सुधीर तुळशीदास न्हावेलकर**
Email – nhavelkarsudhir@gmail.com

**सारांश**

महाराष्ट्राच्या इतिहासातील नव्या युगाची सुरुवात १९ व्या शतकात झाली. अशांततेचा कालखंड संपून नवीन राज्यकर्त्यांच्या नियंत्रणाखाली, सुव्यवस्थित अशा कार्यक्षम शासनाचा प्रारंभ झाला. जातीसंस्थेच्या श्रेष्ठ-कनिष्ठत्वाचा विचारांनी जखडलेला व सामाजिक रूढी, परंपरा यांनी बंदिस्त झालेला समाजाला सामाजिक समतेचा नवा साक्षात्कार या युगात झाला. भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील समाजाला हा सामाजिक शांततेचा, एकतंत्री शासनाचा अनुभव नवा होता. भारतीय समाजाचा पश्चिमात्यांशी संपर्क येण्यास सुरुवात होऊन या संपर्कात त्यांना नवविचार, आचार, भौतिक प्रगती इत्यादींचे ज्ञान होण्यास सुरुवात झाली. त्यातूनच सामाजिक सुधारणांना गती मिळाली. जातीसंस्थेसारखी मजबूत व्यवस्थेलाही समाजसुधारकांनी आपल्या प्रयत्नामुळे धक्का देण्यास सुरुवात केली. महाराष्ट्राच्या इतिहासातील सामाजिक सुधारणा व जातीव्यवस्थेच्या उच्चाटनाचे कार्य उल्लेखनीय आहे. ब्रिटिशांनी भारतात शिक्षण प्रसाराला चालना दिली. प्रारंभीच्या काळात ख्रिश्चन मिशनऱ्यांनीही फार मोठे कार्य केले.

**कळ शब्द :** सामाजिक सुधारणा, जातीव्यवस्था

**प्रस्तावना:**

सामाजिक सुधारणा म्हणजे अनिष्ट चालीरीतींना पायबंद घालून सामाजिक स्वास्थ्य व कल्याण यांसाठी केलेले उपाय व बदल होय. सामाजिक सुधारणांचा मूळ हेतू लोकांचे प्राकृतिक, सामाजिक, मानसिक, बौद्धिक व भावनात्मक स्वास्थ्य अबाधित राखणे हा असतो. या संज्ञेची व्याप्ती वा कृतिकक्षा कालानुसार व सामाजिक कायद्यानुसार बदलत असते. समाजात सतत काहींना काही बदल नेहमी घडत असतात. भारतात इंग्रजांच्या सत्तेच्या प्रस्थापनेनंतर इंग्रजांची शिक्षणव्यवस्था आली आणि पाश्चात्य शिक्षणामुळे भारतीय सुशिक्षितांना आपल्या समाजाकडे पाहण्याची नवी, बुद्धिवादी आणि मानवतावादी दृष्टी प्राप्त झाली. आपल्या समाजातील जाचक रूढी आणि अंधश्रद्धा नाहीशा झाल्या पाहिजेत अशी त्यांची धारणा झाली.

भारतातील इतर राज्याप्रमाणेच महाराष्ट्रातील सामाजिक स्थिती ही वेगळी नव्हती. त्यामुळे महाराष्ट्रात ही सामाजिक सुधारणेचा प्रयत्न होऊ लागला. १९ व्या शतकामध्ये समाजाच्या जडणघडणीवर मुलगामी परिणाम समाज सुधारकांकडून सुधारणेच्या रूपाने झाला. अनिष्ठ रूढी परंपरेच्या चक्रात सापडलेल्या समाजाला परंपरागत गुलामगिरीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न सुरु झाला. ब्रिटीशांच्या इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाने भारावून गेलेल्या भारतीय तरुणांनी भारतीय वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक या गोष्टी किती अन्यायकारक आहेत हे त्यांना जाणवले. आपल्या समाजात सामाजिक सुधारणा करण्याची गरज त्यांना वाटू लागली. १९ व्या शतकाच्या सुरुवातीस महाराष्ट्रीयन समाज अधोगतीकडे वाटचाल करत होता. पेशवाईला लोक फार कंटाळले होते. सतीसारख्या घटनेला विधीपूर्वक मान्यता असल्याने त्याचे गांभीर्य नव्हते.

बालविवाह, लादलेले वैधव्य, विधवांचे विद्रुपीकरण, स्त्रियांना शिक्षणास विरोध, जातीची सखोल बंधने, अस्पृश्यता अशा गोष्टींना धर्माची मान्यता होती. शिक्षण ही मोजक्याच वर्गाची मक्तेदारी बनली होती. समाजातील वाईट रूढी नष्ट करण्यासाठी सुधारकांनी समाज सुधारणा चळवळ सुरु केली होती. महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, राजर्षी शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, पंडिता रमाबाई, रघुनाथ धोंडो कर्वे इत्यादींनी समाजसुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. अनिष्ट सामाजिक रुढींविरुद्ध लढा दिला. इंग्रजी अमदानीच्या आरंभी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी स्त्री शिक्षणाच्या संदर्भात केलेले कार्यही उल्लेखनीय आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

महाराष्ट्रातील सामाज सुधारणेसाठी झालेल्या चळवळींचा अभ्यास करणे.

१. महाराष्ट्रातील जाती उच्चाटनासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके:**

१. महाराष्ट्रातील सामाजिक जीवनामध्ये सुधारणा करण्यासाठी अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले.

२. महाराष्ट्रातील जातीसंस्थेचे असलेले प्रभुत्व कमी व नष्ट करण्यासाठी कार्य करण्यात आले.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध विषयासाठी ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा :**

महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांमध्ये बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या साप्ताहिकातून जनजागृतीचे काम सुरु केले व विधवा विवाह व हिंदू पुनर्प्रवेश या दोन चळवळीचा प्रथम उदय केला. विधवा पुनर्विवाह संघटना विष्णुशास्त्री पंडित व न्यायमूर्ती रानडेनी सुरु केली. न्यायमूर्ती रानडेनी समाज सुधारणेसाठी आणि त्या सुधारणेच्या प्रचारासाठी महाराष्ट्रात सामाजिक परिषद स्थापन झाली. सामाजिक परिषदेच्या माध्यमातून बालविवाह, केशवपन, जातीयतेला विरोध केला. महात्मा फुल्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून १८४८ मध्ये पुण्यात मुलींसाठी शाळा स्थापन केली. अस्पृश्यांसाठीही त्यांनी शाळा काढली. पाण्याचा हौद अस्पृश्यांसाठी खुला केला.

समताप्रधान समाजाच्या निर्मितीसाठी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महर्षी विठ्ठल रामजी यांनी शिंदे डिप्रेस्ड क्लास मिशन या संस्थेची स्थापना केली. तसेच अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी संपूर्ण आयुष्य वेचले. धोंडो केशव कर्वेनी विधवा विवाह प्रतिबंध निवारक मंडळाची स्थापना केली. व अनाथ बालिकाश्रम ह्या संस्थेची स्थापना केली. त्यांच्या हिंगणे स्त्रीशिक्षण संस्थेतर्फे महाराष्ट्रभर कन्याशाळांचे जाळे निर्माण झाले. धोंडो केशव कर्वेनी विधवा महिलांचे प्रश्न आणि त्यांचे शिक्षण यांव्यतिरिक्त जातीव्यवस्था आणि अस्पृश्यता यांच्या विरोधातही कार्य केले.

राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्यावर विशेष भर दिला. कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा केला. पुनर्विवाहाचा कायदा करून विधवाविवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. कोल्हापूर संस्थानात सत्यशोधक चळवळीचा प्रसार आणि प्रचार करण्याचे काम त्यांनी केले. उपेक्षित समाजातील लोकांना आपल्या संस्थानात आरक्षणाच्या माध्यमातून नोकऱ्या देण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या शिक्षणासाठी तसेच मूकनायक वृत्तपत्रासाठी आर्थिक मदत केली. खेडयापाडयातील विविध जातीजमातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे स्थापन केली. डॉ. आंबेडकरांनी स्वतः कष्ट करून शिक्षण घेऊन आपल्या समाजबांधवांना शिका, संघटित व्हा आणि लढा हा संदेश दिला. त्यांच्यासाठी शिक्षणसंस्था उभी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळयावरील सत्याग्रह व काळाराम मंदिर प्रवेश, महाडचा सत्याग्रह केला. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून या संस्थेच्या वतीने मुंबई येथे सिद्धार्थ व औरंगाबाद येथे मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन करून शिक्षणापासुन वंचित लोकांसाठी शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून दिली. सर्व समाजसुधारकांनी धडाडीने केलेल्या कार्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांचा विचार प्रभावी ठरला.

महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांना व्यापक स्वरूप येण्यासाठी अनेक संस्था कार्यरत होत्या. आर्य समाजाची स्थापना महर्षी दयानंद सरस्वती यांनी मुंबई येथे केली. आर्य समाजाने मूर्तीपूजा, अस्पृश्यता, बालविवाह, पडदा पध्दतीला विरोध केला. स्त्रियांच्या प्रगतीसाठी स्त्री शिक्षण महत्त्वाचे मानले. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी परमहंस सभेची उभारणी धर्म सुधारणा, मुर्तीपुजा निषेध, जातीभेद निर्मुलन अशा तत्त्वावर केली होती.

प्रार्थना समाजाची स्थापना आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांनी स्त्री शिक्षण, बाल विवाहास विरोध, विधवा विवाहाला मान्यता, जाती व्यवस्थेला विरोध यासाठी केली. सत्यशोधक समाजाची स्थापना जोतीबा फुलेनी करून सनातनी वृत्ती, दैववाद, अंधश्रद्धा, सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. इत्यादी स्वरूपाचे कार्य महाराष्ट्रात आर्य समाज, परमहंस सभा, सत्यशोधक समाज व समाज प्रार्थना समाजाच्या माध्यमातून करण्यात आले.

**जातिसंस्थेचे उच्चाटन :**

भारतीय जाती व्यवस्था ही भारतीय समाजाची पायाभूत व्यवस्था आहे. प्राचीन भारतात ह्या व्यवस्थेचा विकास झाला आणि ती पुढे मध्ययुगीन काळात, आधुनिक पूर्व काळात आणि आधुनिक काळात बदलत गेली असे मानले जाते. जातिसंस्थेमुळे प्रत्येक जातीतील व्यक्तींच्या स्वातंत्र्यास व नैसर्गिक महत्त्वाकांक्षेस मर्यादा पडल्या. प्रगतीचा वेग मंद राहिला. व्यक्तींच्या नैसर्गिक योग्यतेला संकुचित

क्षेत्रातच बंदिस्त व्हावे लागले. ब्रिटीश राजवटीत आधुनिक पश्चिमी संस्कृतीतील मानवतावादी विचारांचा व सामाजिक न्यायसंबंधी दृष्टिकोणाचा प्रभाव भारतीय आधुनिक सुशिक्षितांवर पडून हिंदू समाजसुधारणेचे आंदोलन भारतात व महाराष्ट्रात सुरु झाले. समता, व्यक्तिस्वातंत्र्य व बंधुभाव या तीन तत्त्वांचा प्रभाव सामाजिक सुधारकांवर पडला. महात्मा जोतीराव फुले, छत्रपती शाहू महाराज, धोंडो केशव कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, साने गुरुजी, सेनापती बापट, सयाजीराव गायकवाड, कर्मवीर भाऊराव पाटील, महात्मा गांधी, गाडगेबाबा, रानडे, आगरकर इत्यादींनी जाती निर्मुलनासाठी कार्य केलेले आहे. संत नामदेव, संत तुकाराम, संत चौखामेळा या संतांनी भक्तीमार्गाने जातीविरोधात कार्य केले आहे. जाती निर्मूलनासाठी व समाजात समानता आणण्यासाठी गोपाळबाबा वलंगकर, शिवराम कांबळे, किसन बदसोडे, नंदा गवळी, नानासाहेब गवई यांनी कार्य केले.

महाराष्ट्राला तीन प्रमुख समाज सुधारकांचा वैचारिक वारसा लाभला असल्यामुळे या राज्यास फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र असे म्हणतात. महाराष्ट्रात सर्व प्रथम महात्मा फुले यांनी जातीसंस्थेला स्पष्ट विरोध करून सर्व जातीधर्माच्या लोकांच्या उन्नतीसाठी कार्य केले. बहुजन समाजातील लोकांवरील परंपरागत लादलेली गुलामगिरी नष्ट करायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखून महात्मा फुलेंनी ब्राह्मणेतर चळवळ सर्व प्रथम निर्माण केली. त्यांनी अनिष्ठ रूढी, परंपरा यांना पाठिंबा देणारे धर्मग्रंथ नाकारले. त्यांनी सार्वजनिक सत्यधर्म, गुलामगिरी असे ग्रंथ लिहून समाजातील वास्तव परिस्थिती सर्व लोकांसमोर मांडली. जोतीराव फुलेचा वारसा पुढे शाहू महाराज यांनी घेतला. शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानात जातीव्यवस्थेला विरोध करत आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले.

कोल्हापूर संस्थानात सर्व जातीतील लोकांसाठी शिक्षण सक्तीचे व मोफत केले. आपल्या संस्थानात सरकारी नोकरीत आरक्षण सुरु करून बहुजन समाजातील लोकांना सरकारी नोकऱ्या उपलब्ध करून दिल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोलंबिया विद्यापीठात १९१६ रोजी 'भारतातील जाती, त्यांची रचना, उत्पत्ती आणि वृद्धी' या नावाचा शोधनिबंध वाचला होता. त्यांच्या मते, जातीय भेदभाव व धार्मिक भेदभाव नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाह हा एक प्रभावी उपाय आहे. बहिष्कृत समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. महाड या ठिकाणी चवदार तळ्याचा सत्याग्रह व नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेश करून समानतेचा लढा सुरु केला. १९३६ मध्ये 'जातीप्रथेचे निर्मुलन' हा ग्रंथ प्रकाशित झाला. स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना करण्यामागील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्देश होता की, भारतातील जी कामगार चळवळ आहे त्यांची उद्दिष्टे केवळ आर्थिक असून चालणार नाही ती शोषणमुक्ती बरोबरच जातीविरहित असली पाहीजे. पुढे बाबासाहेबांनी ऑल इंडिया शेड्युल्ड कास्टस फेडरेशन या राजकीय पक्षाची व पीपल्स एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेची स्थापना करून बहुजन समाजातील लोकांमध्ये आपल्या हक्कांप्रती जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. समाजातील होणाऱ्या उपेक्षित व अपेक्षित गोष्टी जनसामान्यांपर्यत पोहचविण्यासाठी मूकनायक हे पाक्षिक, बहिष्कृत भारत, समता, जनता, प्रबुद्ध भारत हे वृत्तपत्रे सुरु केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मते, लोकशाही व्यवस्थेत मानवाच्या सर्वागीण विकासासाठी उपयुक्त असे वातावरण असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत पूर्वीपासून चालत असलेली भारतीय समाजातील विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष:**

भारतातील इतर राज्यांची परिस्थिती पाहता महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा प्रभावी आहेत. जाती उच्चाटनाचे सर्व प्रथम प्रयत्न खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात झालेले आहे. आज मात्र राजकारण, अर्थकारण व समाजकारणात जातीव्यवस्थेचा प्रभाव वाढलेला दिसत आहे. महाराष्ट्रातील सुधारणावादी विचारांना महत्त्व न देता जातीपातीच्या राजकारणाला महत्त्व दिले जाते.

महाराष्ट्राच्या राजकारणात जात हा घटक प्रभावी असलेला दिसून येतो. महाराष्ट्रात मराठा लॉबी, ब्राह्मणेतर समाज, दलित दलितेतर, मराठा-मराठेतर इत्यादी पध्दतीने राजकारणाचे डावपेच रचताना जातीचा आधार प्रत्येक राजकीय पक्ष घेताना दिसतो. त्यामुळे महाराष्ट्राच्या प्रगतीला अडथळा निर्माण झाला आहे. युवा वर्गाने समाजातील तत्कालीन गंभीर प्रश्न समजून घेऊन ते सोडवण्याचा प्रयत्न केल्यास प्रगतीचा प्रवाह नेहमी कोणताही अडथळा न राहता कायम सुरु ठेवता येईल.

**संदर्भ सूची:**

१. आंबेडकर डॉ. भी. रा., जातीसंस्थेचे उच्चाटन, (अनु. वसंत मून) नाग – नालंदा प्रकाशन, सांगली, २०१५.
२. गव्हाणे डॉ. किशोरकुमार, डॉ. एस. पी. शिंदे, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास (१८१८ ते १९६०), एज्युकेशनल व पब्लिशर्स. औरंगाबाद, २०१४.

३. थोरात सुखदेव, 'महाराष्ट्रातील अस्पृश्यता, जातीय भेदभाव आणि दलितांवरील अत्याचार : व्याप्ती, कारणे आणि उपाय', सुगावा प्रकाशन, पुणे, २०१८.

४. फडके य. दी., 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र', केसागर पब्लिकेशन्स, पुणे, २०१३.

५. भिडे जी. एल., एन. डी. पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०१०.